27-01-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01/26/2025 9:31 PM Page 1



# महिला विश्वचषकमध्ये भारताची उपांत्य फेरीत धडक!

## बांगलादेशचा ८ गडी राखून पराभव, वैष्णवीने घेतले ३ बळी : त्रिशाने ४० धावा केल्या

**नवी दिल्ली, दि. २६ :**

आयसीसी अंडर-१९ महिला विश्वचषक स्पर्धेत भारताने बांगलादेशचा ८ गडी राखून पराभव केला आहे. क्वालालंपूरमधील या विजयासह भारतीय महिला संघाने उपांत्य फेरी गाठली आहे.

आयसीसी महिला अंडर-१९ विश्वचषकात आज सुपर सिक्समध्ये भारताचा सामना बांगलादेशशी झाला. टीम इंडियाने बांगलादेशवर ८ गडी राखून सहज विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ८ बाद ६४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने ७.१ षटकांत २ गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केला. जी त्रिशाने ३१ चेंडूत ८ चौकारांच्या मदतीने ४० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली आणि भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.



गोलंदाज वैष्णवी शर्मानेही शानदार गोलंदाजी करत ३ विकेट्स घेतल्या.

भारतीय महिला अंडर-१९ संघाची कर्णधार निक्की प्रसादने नाणेफेक जिंकून बांगलादेशविरुद्ध प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टीम इंडियाचा हा निर्णय योग्य ठरला. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने निर्धारित २० षटकात ८ विकेट्स गमावत केवळ ६४ धावा केल्या. संघाला १०० धावांचा टप्पाही पार करता आला नाही.

बांगलादेशकडून कर्णधार सुमैया अक्तरने सर्वाधिक २१ धावा केल्या. ती नाबाद राहून पॅव्हेलियनमध्ये परतली. सुमैया आणि जन्नतुल मौया यांच्याशिवाय अन्य कोणत्याही फलंदाजाला दोन अंकी धावसंख्या गाठता आली नाही. भारताकडून वैष्णवी शर्माने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. याशिवाय शबनम शकील, जोशिथा आणि जी त्रिशा यांनी प्रत्येकी एक विकेट्स घेतली.

६५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने फारसा उशीर केला नाही. त्यांनी हे लक्ष्य केवळ ७.१ षटकांत म्हणजे ३७ चेंडूत ८ विकेट्स राखून पूर्ण केले. जी त्रिशा आणि जी कमलानी यांच्या रूपाने टीम इंडियाच्या केवळ २ विकेट्स पडल्या. त्रिशाने पुन्हा एकदा चांगली कामगिरी केली. त्याने एकट्याने ४० धावा केल्या. याशिवाय कर्णधार सानिका चाळकेने नाबाद ११ आणि कर्णधार निक्की प्रसादने नाबाद ५ धावा केल्या. बांगलादेशकडून अनिसा अक्तार सोबा आणि हबीबा इस्लामने प्रत्येकी १ विकेट्स घेतली. टीम इंडियाची पहिली विकेट २३ आणि दुसरी ६१ धावांवर पडली.

---

## निवडक



नास्नोडा : सुभाष चंद्रबोस जयंती साजरी अध्यक्ष रायकर व रवींद पणजीकर.

### नास्नोडा सरकारी विद्यालयात सुभाष चंद्रबोस जयंती साजरी

*टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. २६ :** नास्नोडा येथील सरकारी प्राथमिक विद्यालयात सम्राट क्लब हळदोणातर्फे सुभाष चंद्रबोस जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र पणजीकर उपस्थित होते, त्यांनी सुभाष चंद्रबोस यांनी गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगुन सुभाषचंद्र बोस यांचे कार्य तरुणादायी प्रेरणादायी होते व त्यातूनच ते स्वातंत्र्य लढ्यात जोडले जायचे असे पुढे बोलताना सांगितले. सुभाष चंद्रबोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. तूम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दूंगा तसेच जय हिंदचा नारा त्यांनी दिला, असे त्यांनी पुढे सांगितले. सुरुवातीला समई प्रज्वलन व नेताजी सुभाषचंद्र बोस तसबीराला पुष्पहार अर्पण करण्यात आला. अध्यक्ष सर्वेश रायकर यांनी स्वागत केले. खजिनदार रामा केरकर यांनी प्रासविक केले. मंगल हळदोणकर यांनी आभार मानले. शिक्षिका अविष्का आजगावकर व अफसा शेख यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदत केली.

---



पणजी : सायकल यात्रेचे गोव्यात स्वागत करताना गोवा सरकार औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संघटनेतर्फे स्वागत करताना अनिल भोसले व गोविंद गोवेकर.

### पुणे ते कन्याकुमारी सायकल यात्रेचे स्वागत

*टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २६ :** पुणे ते कन्याकुमारी सायकल यात्रेचे गोव्यात धारगळ येथे स्वागत करण्यात आले. पुणे ते कन्याकुमारी सायकल यात्रा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तसेच युनायटेड फेडरेशन औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रीय सचिव महादेव मालीजी हे आपल्या सिंहगड ग्रुप सहित गोव्यामध्ये त्यांचे आगमन झाले. या सायकल यात्राचे औचित्य साधून ते छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सर्व जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ते करत आहेत त्याचप्रमाणे प्लास्टिक मुक्त भारत, बेटी बचाओ बेटी पढाओ, गो ग्रीन असा संदेश ते सर्वांना देत आहेत. त्याचप्रमाणे आगामी काळात त्यांनी ३५ देशांना सायकल यात्रा करून भेट देण्याचा संकल्प केला आहे. त्यात ते पहिल्यांदा दुबईला भेट देणार आहे. विशेष म्हणजे हे सर्व सायकल स्वार साठ वर्षे वयोमर्यादेचे आहेत. त्यांचा तो दृढ निश्चय, आत्मविश्वास सर्वाना प्रेरणादायी आहे. ते दिवसाला १५० ते २०० किलोमीटर सायकल प्रवास करतात. गोव्यात त्यांचे स्वागत गोवा सरकारी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संघटनेचे अध्यक्ष अनिल भोसले व इतर पदाधिकारी तसेच शिवराज्य प्रतिष्ठान गोवा चे अध्यक्ष गोविंद पुंडलिक गोवेकर व सहकारी यांनी पुष्पमाला व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन त्यांचे स्वागत व सत्कार केला व पुढील प्रवासासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

---

### पार्से पंचायतीतर्फे आज प्रजासत्ताक दिन

*टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. २६:** पार्से पंचायतीतर्फे रविवार दि. २६ रोजी सकाळी ८.३० वाजता श्री भगवती मंदिरासमोरील हुतात्मा स्मारक जवळ प्रजासत्ताक दिनाचे विशेष आयोजन केले आहे. यावेळी पंचायतीतर्फे विद्यार्थी गौरव सोहळा व मनोरंजनाचा कार्यक्रम होईल. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मांद्रेचे आमदार तथा गोवा गृहनिर्माण महामंडळाचे अध्यक्ष जीत आरोलकर, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर सन्माननीय अतिथी म्हणून माजी आमदार दयानंद सोपटे, माजी जिल्हा पंचायत सदस्य दीपक कळंगुटकर उपस्थित राहणार आहेत. याशिवाय पार्से सरपंच अजय कलगुटकर, उपसरपंच रेश्मा कांबळी व अन्य पंचायत सदस्य उपस्थित राहतील.

---




**कुडचडे : स्वामीजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना दिगंबर कामत. सोबत मोर्तू नाईक, सदानंद खांडेकर, ज्ञानेश्वर नाईक, राजू अंगठी, शिवाजी वस्त, मोहनदास गावस देसाई व इतर.**

### दयानंद कला केंद्रातर्फे स्वामी विवेकानंद जयंती साजरी

*टीम दैनिक हेराल्ड*

**कुडचडे, दि. २६ :** कुडचडे चंदेरी महोत्सवात जगतगुरु स्वामी विवेकानंदांच्यी १६२ वी जयंती पुर्व संधेला, महोत्सव समारोप सोहळ्यात दयानंद कला केंद्रातर्फे साजरी करण्यात आली. या समारंभात गोवा राज्याचे पुर्व मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी स्वामीजीच्या तैल चित्राला पुष्पहार अर्पण करून आदरांजली दिली. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात सहभागी होताना आपणास आनंद होतो आणि भाग्यवानही समजतो कारण पोर्तुगीज राजवटीत स्वामी विवेकानंदजी गोव्यात धर्म प्रचार मोहीमेवर आले होते. या थोर देशभक्तांच्या पाउलाचा स्पर्श मडगाव शहराला झाला होता. आज त्याच्या स्मृतींना उजाळा देणयाचे भाग्य मला चंदेरी वरून लाभले. यावेळी त्याच्या सोबत आशाताई कामात होत्या. दयानंद केंद्र अध्यक्ष मोर्तू नाईक यांनी पाहुण्यांचे स्वागत केले सचिव बंटी उडेलकर यांनी थोडक्यात केंद्राने केलेल्या युवा कार्याची माहिती सांगितली. सन १९१९-९० वा उत्कृष्ठ गोवा राज्य युवा संस्था पुरस्कार केंद्राला लाभला. संस्थेने कुडचडयात ४थे अखिल भारतीय युवा संमेलन आयोजन केले त्यामध्ये देशातील १०० युवक -युवतींनी भाग घेतला संमेलनाचे उदघाटन माजी केंद्रीय रसायन राज्य मंत्री फालेरो यानी केले होते. अधून मधून संस्था युवा विकास व कल्याण कार्यावर कला, क्रीडा, समाज कल्याण, देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करते यंदाच्या चंदेरी महोत्सवात कॉलेज व इतर युवकासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. शेवटी नवीन खांडेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

---



**कुडाळ सुकळवाडी : 'गोंधळ'त साळ गोवा देवस्थान अध्यक्ष कालिदास राऊत व इतरासमवेत शिवसेना नेते माजी खासदार विनायक राऊत.**

### कुडाळ येथील भवानीच्या 'गोंधळा'ला साळ देवस्थान समिती उपस्थित

*टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. २६ :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यामधील तळेगाव सुकळवाडी येथील श्री भवानी देवीच्या वार्षिक 'गोंधळा'ला गोव्यातील डिचोली तालुक्यामधील साळच्या श्री महादेव भूमिका देवस्थान समितीचे पदाधिकारी, महाजन व ग्रामस्थ उपस्थित होते.

सुकळवाडी ठिकाणचे राऊत कुटुंबियाचे साळ मधील श्री भूमिका देवी ही कुलदैवत आहे. त्यामुळे शिवसेना (उबाठा) गटाचे माजी खासदार विनायक राऊत हे साळ मधील देवीच्या प्रत्येक उत्सवाला वर्धापन दिन, गडेत्सवाला आवर्जून उपस्थित राहतात . त्यामुळे त्यांचे येणे जाणे सुरू असल्याने प्रत्येक वर्षी तेथील श्री भवानी देवीच्या वार्षिक गोंधळाला साळ देवस्थान समितीला आमंत्रित केले जाते .यावेळी देवस्थान अध्यक्ष कालिदास (बाळू) राऊत, पांडुरंग परब (सहसचिव), आदिनाथ परब (मुखत्यार), नीलेश परब, नारायण (नानी) राऊत, सगुण राऊत, लाडू परब, प्रभाकर च्यारी, शाम्बा घुरे, संतोष राऊत व दिलीप देसाई आदी मान्यवरांनी देवस्थानला भेट दिली.

श्री भवानी देवस्थानच्या समितीने व्यासपीठावर साळ मधील मान्यवरांचे यथोचित आदरातिथ्य केले तद् नंतर माजी खासदार विनायक राऊत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सर्वांना सन्मानित केले . यावेळी शिवसेना (उबाठा)चे माजी आमदार वैभव नाईक व शिवसेना उबाठा गटाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

---

## प्रायॉरिटी टायटन्स, काणकोण मठग्राम युनायटेड विजयी

*टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २६ :** गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी-२० क्रिकेट स्पर्धेत शनिवारी झालेल्या सामन्यांत प्रायॉरिटी टायटन्सने सिंक रेंजर्स यूसीचा ११० धावांनी तर काणकोण मठग्राम युनायटेडने म्हापसा ड्रीम क्रशर्स यूसीचा ५ गडी व ८ चेंडू राखून पराभव केला.

मडगावच्या एमसीसी मैदानावर सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात प्रायॉरिटी टायटन्सने २० षटकांत ८ गडी गमावून १९९ धावांचा डोंगर उभा केला. सिंकने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारल्यानंतर प्रायॉरिटीकडून सिद्धेश आमोणकर याने सर्वाधिक ३५ धावा केल्या. अष्टपैलू सिद्धार्थ घाणेकरने २० चेंडूंत झटपट नाबाद ३२ व विक्रांत प्रभूने आठव्या स्थानावर येताना ९ चेंडूंत ३ षटकार व १ चौकारासह २६ धावा चोपल्या. रेंजर्सकडून तुनीश सावकार याने सर्वाधिक ३ गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल खेळताना सिंक रेंजर्स युसीचा डाव १५.१ षटकांत केवळ ८९ धावांत आटोपला. सिंक रेंजर्सकडून समृद्ध भरणे याने सर्वाधिक ३५ धावा जमवल्या. विक्रांत प्रभूने गोलंदाजीतही चमक दाखवताना १३ धावांत ३ गडी बाद केले. त्याला सामनावीर पुरस्कार प्राप्त झाला. स्मितेश दिवेकरने ४ धावांत ३ गडी बाद केले.




**सगुण नाईक व सिद्धार्थ घाणेकर यांच्याकडून अनुक्रमे सामनावीर व हिरो ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना कृष्णकांत हेगडे देसाई व रामनाथ प्रभू**

दुपारच्या सत्रात झालेल्या सामन्यात म्हापसा ड्रीम क्रशर्सने प्रथम फलंदाजी करताना १९.५ षटकांत सर्वबाद १३७ धावा फलकावर लगावल्या. साईश हेगडे (३७) व सर्वेश कामत (३५) यांनी ७९ धावांची खणखणीत सलामी दिल्यानंतरही ड्रीम क्रशर्सला दीडशेपार पोहोचणे शक्य झाले नाही. काणकोण संघाकडून कृष्णकांत हेगडे देसाईने अवघ्या १० धावांत ४ गडी बाद करत म्हापसाची धावसंख्या नियंत्रणात ठेवली. लक्ष्याचा पाठलाग करताना विराज पुराणिक (३२) व साहील मांद्रेकर (३४) यांनी काणकोण मठग्राम युनायटेडला केवळ ४.५ षटकांत ५० धावांची सलामी दिली. साहीलने यानंतर सुमिरन आमोणकर (२०) याच्यासह दुसऱ्या विकेटसाठी ४५ धावा जोडल्या. यानंतर काही धक्के बसल्याने त्यांची ५ बाद ११७ अशी घसरगुंडी उडाली होती. पण, रामनाथ प्रभू बाम (९ चेंडूंत नाबाद २०) व अमेय राजाध्यक्ष (नाबाद ९) यांनी अधिक पडझड होऊ न देत काणकोण मठग्रामला १८.४ षटकांत लक्ष्य गाठून दिले. कृष्णकांत हेगडे देसाई या सामन्याचे मानकरी ठरले.

**संक्षिप्त धावफलक**

प्रायॉरिटी टायटन्स - २० षटकांत ८ बाद १९९ (सिद्धेश आमोणकर ३५, सिद्धार्थ घाणेकर नाबाद ३२, अनीश महांबरे २९, विक्रांत प्रभू २६, वेद महांबरे २१, तुनीश सावकार ३८-३, सनत म्हापणे ३९-१, अनीश काकोडे १७-१, आशय आंबे २४-१, वामन नाडकर्णी १५-१) विजयी वि. सिंक रेंजर्स यूसी - १५.१ षटकांत सर्वबाद ८९ (समृद्ध भरणे ३५, साहील अडवलपालकर १४, सनत म्हापणे ११, स्मितेश दिवेकर ४-३, विक्रांत प्रभू १३-३, व्यंकट बिचे १०-१, कपिल सिनाय बोरकर १०-१, गौरिश प्रभुदेसाई १३-१)

म्हापसा ड्रीम क्रशर्स - १९.५ षटकांत सर्वबाद १३७ (साईश हेगडे ३७, सर्वेश कामत ३५, संजय नेत्रावळकर २३, कृष्णकांत हेगडे देसाई १०-४, रामनाथ प्रभू बाम १३-२, प्रणव कामत २१-१, विराज पुराणिक १४-१) पराभूत वि. काणकोण मठग्राम युनायटेड - १८.४ षटकांत ५ बाद १४३ (साहील मांद्रेकर ३४, विराज पुराणिक ३२, सुमिरन आमोणकर २०, रामनाथ प्रभू बाम नाबाद २०, व्यंकटेश वेर्लेकर १७-३, विपुल देशप्रभू ३५-१).

---

## कर्तव्याप्रती जागरूक राहायला हवे

### राजश्री रेडकर : पेडण्यात राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त कार्यक्रमात

*टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. २६ :** घटनेने बहाल केलेल्या अधिकारा इतकेच प्रत्येकाने आपल्या कर्तव्याप्रती जागरूक राहायला हवे असे प्रतिपादन पेडणे येथील सरकारी उच्च माध्यमिक विद्यालयांच्या प्राचार्य सौ राजश्री रेडकर यांनी केले.

पेडणे तालुका निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे राष्ट्रीय मतदार दिना निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यास पिठावर पेडणे तालुका उपजिल्हाधिकारी शिवकुमार नाईक, पेडणे तालुका मामलेदार रणजित साळगावकर, सरकारी हायस्कूल दाडाची वाडीचे ज्येष्ठ शिक्षक तथा नोडल ऑफिसर वसंत कोळंबकर, कोरगावच्या श्री कमलेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यापक तथा नोडल ऑफिसर विठोबा बगळी, रामदास दावरे आदी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी शिवकुमार नाईक म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर समाधान न मानता सामजिक दृष्टीकोन बाळगून राष्ट्र हित साधायला हवे. कारण देश घडविण्याची ताकद विद्यार्थ्या मध्ये निश्चितच आहे, असे सांगितले. वसंत




**पेडणे : विविध स्पर्धात बक्षिसे मिळवलेले स्पर्धक प्राचार्य राजश्री रेडकर, उपजिल्हाधिकारी पेडणे शिवकुमार नाईक, मामलेदार रणजित साळगावकर, नोडल ऑफिसर वसंत कोळंबकर, विठोबा बगळी व इतर**

कोळंबकर यांनी चुनाव पाठशाळे संधर्भात सविस्तर माहिती दिली. यावेळी विठोबा बगळी यांनी सांगितले की, मतदार जागृती हे राष्ट्रीय कार्य आहे, त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. याप्रसंगी विविध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली, त्यात पुढील विद्यार्थी व शिक्षकांचे समावेश होता.

हायस्कूल विभाग - घोषणा लेखन स्पर्धा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय - सार्थक रवींद्र मलीक (हुतात्मा बापू गवस हायस्कूल चांदेल), श्रावणी पराबकर (सरकारी हायस्कूल, वझरी) प्राची पेडणेकर (शहीद रामसिंग स्मृति हायस्कूल तोर्से). टी शर्ट डीझाइन - यशश्री च्यारी (सरकारी हायस्कूल, हणखणे), सावी आसोलकर (सेंट जोसेफ, पेडणे), अनुष्का साळगावकर (सरकारी हायस्कूल, वझरी).

इको फ्रेंडली रांगोळी - निधी तुळसकर (सरकारी हायस्कूल दाडाचीवाडी), मधुरा देसाई ( सरकारी हायस्कूल, हणखणे), वेदिका तेली (व्हायकाऊंट, पेडणे). पतंग तयार करणे - सिद्धी पेडणेकर (व्हायकाऊंट हायस्कूल, पेडणे), सुरभी ठाकूर (सेंट जोसेफ, पेडणे), पूर्वा गवस ( हलार्न पंचक्रोशी). नोडल ऑफिसर ऑफ द इयर - श्रद्धा नाईक (हुतात्मा बापू गवस हायस्कूल, चांदेल).

उच्च माध्यमिक विद्यालय ग्रुप - घोषणा लेखन स्पर्धा - प्रथम व द्वितीय स्नेहल गडेकर (सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय पेडणे), सानिका देऊसकर (श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय कोरगाव). टी-शर्ट डीझाइन - अमोघ सावंत (श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, कोरगाव), चिन्मय राऊळ - सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय पेडणे. रांगोळी स्पर्धा - सिया कांनाईक व साक्षी भिसाजी (श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, कोरगाव), मयुरी गावडे - सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय पेडणे. पतंग तयार करणे -आदित्य मोटे (सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय पेडणे, चैताली रांगणेकर (श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, कोरगाव). नोडल ऑफिसर ऑफ द इयर - विठोबा बगळी (श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, कोरगाव), उत्कृष्ठ क्लब - सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय, पेडणे. उत्कृष्ट बीएलओ - उदय गुरव, सुशांती आपुले, आदिती पालयेकर, स्नेहा मांद्रेकर, आदिती पालयेकर यांनी मान्यवरांना पुष्प गुच्छ प्रदान केले. उपजिल्हाधिकारी शिवकुमार नाईक यांनी शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास दावरे यांनी केले व आभार मानले.

---



**झुआरीनगर : कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत. सोबत फा. फ्रेड्रिक रॉड्रिग्ज, ज्योती कुंकळकर व राजश्री सैल.**

### फादर आग्नेल महाविद्यालयात 'मनोहरराय सरदेसाय'वर माहितीपट

*टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी दि. २५ :** फादर आग्नेल महाविद्यालय कला आणि वाणिज्य आणि गोवा कोंकणी अकादेमी, यांच्या संयुक्त विद्यमाने मनोहरराय सरदेसाय आणि रवींद्र केळकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्याने ज्योती कुंकळकर निर्मित व दिग्दर्शीत लोककवी मनोहररायांच्या कार्य आणि साहित्यावर आदारीत माहितीपट दाखवण्यात आला.

यावेळी व्यासपिठावर फादर फ्रेंडीक रॉड्रिग्स, कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत, ज्योती कुंकळकर आणि राजश्री सैल उपस्थित होत्या.

वसंत सावंत म्हणाले, मनोहरराय हे कोंकणीतले सर्वश्रेष्ठ कवी म्हणून सर्वांना त्यांचा अभिमान आहे. कोंकणी काव्याला आशय आणि आकार देऊन त्यांनी कोंकणी भाषा समृद्ध केली.ज्योती कुंकळकर म्हणाल्या हे वर्ष रवीन्द्रबाब आणि मनोहरबाब यांचे शताब्दी वर्ष आहे. दोघांनीही कोंकणीच्या प्रगतीसाठी कार्य केले. रवींद्र बाबाने आम्हाला रायटर हा फायटर असतो असा मंत्र दिला तर 'मनोहरबाबा तुम्ही जागे व्हा' हा संदेश दिला.

यांच्यावर माहितीपट करण्याची संधी मला मिळाली. २० वर्षांपूर्वी माहितीपट करताना एका सामान्य लेखिकेला सहकार्य केले हेच माझे भाग्य. फादर फ्रेड्रिक रॉड्रिग्स यांनी पाहूण्यांना पूष्पगुच्छ दिले. प्रा. राजश्री सैल यांनी पाहूण्याचे स्वागत केले. तर सूत्रसंचालन संम्रती तळेकर ने केले तर आभार प्रा. वेल्सिया वाझ यांनी मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 145 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .